:: प्रसिध्दी पत्रक :: दिनांक 20/02/2026

आरोपी लोकसेवक श्री व्यंकटेश बाबुराव मुंडे वय 47 वर्षे व्यवसाय नौकरी तहसिलदार परळी वै. तालुका परळी जि.बीड ह. रा. विध्यानगर परळी वै. जि.बीड मुळ रा.श्रीनिवास निवास यशोविहार कॉलनी पावडेवाडी नाका,नांदेड ता.जि.नांदेड, मु.पो.शिरशी ता. सोनपेट जि.परभणी ,वर्ग 1 यांनी 50,000 हजार रूपये (पन्नास हजार रूपये) मागणी करुन तडजोडीअंती 20000 हजार रुपये स्वतः साठी लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांच्याकडुन कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड युनिट, |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | परळी वै.शहर |
| आरोपीचे नांव व कार्यालय पत्ता | लोकसेवक श्री व्यंकटेश बाबुराव मुंडे वय 47 वर्षे व्यवसाय नौकरी तहसिलदार परळी वै. तालुका परळी जि.बीड ह. रा.विध्यानगर परळी वै. जि.बीड मुळ रा.श्रीनिवास निवास यशोविहार कॉलनी पावडेवाडी नाका,नांदेड ता.जि. नांदेड, मु.पो.शिरशी ता.सोनपेट जि.परभणी ,वर्ग 1 |
| लाच मागणी व स्विकारलेली रक्कम | 50,000/रु लाच मागणी करुन तडजोडीअंती 20000 रुपये स्विकारण्याचे मान्य केले. |
| सापळा अधिकारी | पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड. |
| लाच मागण्याचा हेतु | दि.11.02.2026 रोजी लाप्रवि बीड येथे तक्रारदार यांनी परळी वै.येथे दि.11.02.2026 रोजी तक्रार दिली की मला कोर्ट जामिनी करीता 700000 [illegible] रूपायाची सॉलंसी ऐपतदार प्रमाणपत्र काढण्यासाठी तहसिलदार परळी यांचेकडे अर्ज केला असून त्यांनी मला सॉलंसी ऐपतदार प्रमाणपत्र देण्यासाठी 50000 हजार रुपयाची मागणी करत आहेत. परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचे कडे परळी वै.येथे तक्रार दिली |
| थोडक्यात माहिती | दि.11.02.2026 रोजी तक्रा तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी तक्रारदार व पंच क्र.1 यांना तहसिल कार्यालय परळी वै. जि.बीड येथे पाठवुन लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे श्री. मुंडे व तक्रारदार यांची तहसिल कार्यालय परळी वै.येथील तहसिलदार यांचे कक्षात भेट झाली. भेटी दरम्यान कामासंदर्भाने चर्चा झाली त्यावेळी आलोसे मुंडे यांनी 50 अंक चिठठीवर असे लिहून 50000 हजार रुपयाची मागणी केली. तक्रारदार म्हणाले कमी करा काही तुमच्या मनानी त्यावर तडजोडीअंती चिठठीवर 25 आकडा लिहला असता तक्रारदार यांनी 20000 हजार रूपये देवू का असे म्हणाले तेव्हा लोकसेवक मुंडे यांनी आणखी तिन टाका असे म्हणून 23000 हजार रूपयाची लाचेची मागणी केली त्यावेळी तक्रारदार यांनी 20000 हजार रूपये देतो असे म्हणाले असता लोकसेवक यांनी ठिकय.. पेडींग ठेवू नका असे म्हणून 20000 हजार रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम 20000 हजार रुपये लागलीच स्विकारण्याचे मान्य केले.<br>दिनांक 11.02.2026 रोजी लागलीस सापळा कारवाईचे आयोजन केले असता लोकसेवक मुंडे यांनी सदर रक्कम स्वीकारली नाही. दि.16.02.2026 रोजी सापळाचे आयोजन केले असता लोकसेवक श्री मुंडे यांनी लाच रक्कम स्वीकारले नाही. दि.17.02.2026 रोजी तक्रारदार व पंच यांचे सह सापळा कारवाई तहसिल कार्यालय परळी वै.येथे अजमावली असता लोकसेवक मुंडे व तक्रारदार यांची भेट झाली कामा संदर्भाने चर्चा झाली सॉलंसी झाली सकाळी त्यावर तक्रारदार यांनी मुंडे साहेब तुम्ही म्हणाल्याप्रमाणे ते पाकीट ..पाकीट देयचयं.. कालबी आलतो..त्यावर लोकसेवक मुंडे यांनी काही न बोलता शासकीय वाहनाकडे निघुन गेले.तक्रारदार व पंच यांच्या बद्दल संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. मुळ तक्रारदार यांनी लोकसेवक मुंडे हे यापुढे माझे कडुन लाच रक्कम 20,000/ रुपये स्विकारणार नाहीत असे कळवुन आपण झालेल्या कारवाईवरुन कारवाई करावी अशी विनंती केल्याने आम्ही लोकसेवक मुंडे यांना परळी वै. येथुन ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द आज दिनांक 20.02.2026 रोजी पोलीस ठाणे परळी वै.शहर येथे कलम 7,भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, श्री. शशिकांत शिंगारे, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि छत्रपती संभाजी नगर,यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले, सपोउपनि सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार मच्छिंद्र बीडकर,अनिल शेळके,पांडुरंग काचगुंडे,अमोल खरसाडे, संतोष राठोड, अविनाश गवळी, प्रदिप सुरवसे,राजकुमार आघाव,बिभिषण सांगळे,सचिन काळे, चालक अंबादास पुरी गणेश,म्हेत्रे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड.
संकेतस्थळ :– acbwebmail@mahapolice.gov.in
ई–मेल :– 1 dyspacbbeed@mahapolice.gov.in
:- 2 dyspacbbeed@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोल फ्रि कमांक :– 1064
दुरध्वनी कमांक :– 02442–222649
व्हॉटस अप क. :– 9930997700
पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर :– 9011092777
अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, छत्रपती संभाजी नगर :– 9923102205
पोलीस उप अधीक्षक,लाप्रवि,बीड :– 9270221064, 9518973185

(सोपान चिट्टमपल्ले)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड.

Office of the D.Y.S.P. Anti Corruption, Bureau Beed

Scanned with OKEN Scanner